# या उत्सवपर्वात ग्राहकांना आकर्षक ऑफर देण्यासाठी फ्लिपकार्ट आणि पेटीएमची भागिदारी

- *फ्लिपकार्टवर पेटीएम वॉलेट आणि पेटीएम यूपीआयद्वारे रक्कम अदा करण्याची ग्राहकांसाठी सोय*
- *खरेदीदारांना पेटीएम वॉलेट आणि यूपीआयद्वारे केलेल्या व्यवहारांवर खात्रीशीर रोख परतावा*

**बंगळुरू, ५ ऑक्टोबर २०२० :** फ्लिपकार्ट या भारतीय ई-कॉमर्स बाजारपेठेने आज पेटीएम या भारतातील आघाडीच्या डिजिटल आर्थिक व्यवहार सेवा पुरवठादार व्यासपीठासमवेत भागिदारीची घोषणा केली. आगामी उत्सवपर्वासाठी फ्लिपकार्टचे ग्राहक आपल्या मनपसंत खरेदीची यादी तयार करण्याच्या तयारीत असताना या भागिदारीमुळे त्यांना असंख्य आकर्षक ऑफर्स आणि सवलतींचा लाभ मिळणार आहे. या भागिदारीमुळे पेटीएमच्या लक्षावधी वापरकर्त्यांना फ्लिपकार्टच्या बिग बिलियन डेज दरम्यान खरेदी केल्यानंतर पेटीएम वॉलेट आणि पेटीएम यूपीआयद्वारे अत्यंत सुलभरित्या रक्कम अदा करता येणार आहे.

पूर्वानुभवाचा विचार केल्यास बिग बिलियन डेजदरम्यान वॉलेट बॅलन्समधून रक्कम अदा करणे हा पेटीएम वापरकर्त्यांसाठी खरेदीचा सर्वात जलद मार्ग असेल, ज्यामुळे फ्लॅश सेल्स आणि मर्यादित साठा असलेल्या उत्पादन खरेदीची त्यांची संधी हुकणार नाही. याखेरीज फ्लिपकार्टच्या ग्राहकांना त्यांच्या पेटीएम वॉलेटमध्ये तात्काळ रोखपरतावा मिळवण्याचा आनंदही लुटता येईल.

इंटरनेटच्या नव्या वापरकर्त्यांनी त्यांच्या दैनंदिन खरेदीसाठी डिजिटल माध्यमांचा अवलंब केल्यामुळे भारतात पेमेंटच्या डिजिटायझेशनला मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली आहे. डिजिटल इंडिया मिशन यशस्वी होण्यासाठी परस्परपूरक व्यवसाय परिसंस्था विकसित करणे ही एतद्देशीय कंपन्यांची सामूहिक जबाबदारी आहे. फ्लिपकार्टला भारतीय ग्राहकांची सखोल समज असून ग्राहकांना त्यांच्या सोयीच्या अशा डिजिटल माध्यमाच्या वापराच्या दिशेने नेण्यासाठी आपल्या व्यासपीठावर क्रेडिट आणि पेमेंटसंबंधी विविध सुविधा विकसित करण्यासाठी ते सातत्याने पावले उचलत आहेत. ई कॉमर्सद्वारे मनपसंत उत्पादनांची खरेदी केल्यानंतर सत्र संपवतेवेळी ग्राहकांना विविध माध्यमांतून पेमेंट करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

पेटीएम हा मोठ्या प्रमाणावरील जनसमूहाला कल्पक सोल्यूशन्स उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध असलेला अग्रणी तंत्रज्ञान उद्योग आहे. पेटीएम वॉलेट आणि पेटीएम यूपीआयमुळे फ्लिपकार्टवरील खरेदीदारांना ई कॉमर्स ॲपद्वारे खरेदी करताना केवळ एका क्लिकच्या आधारे खरेदीप्रक्रिया विनासायास पूर्ण करून आपले सत्र संपवता येते. उत्सवपर्वात देशभरातील ऑर्डर्समध्ये मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या वाढीची पूर्तता करण्यासाठी फ्लिपकार्ट करत असलेल्या तयारीशी सुसंगत अशी ही भागिदारी आहे.

**फ्लिपकार्टच्या फिनटेक आणि पेमेंट्स समूहाचे प्रमुख रणजीत बोयानपल्ली या भागिदारीसंदर्भात म्हणाले,** “पेटीएम समवेतची आमची ही भागिदारी डिजिटल पेमेंट सोल्यूशन्स ग्राहककेंद्री व सर्वसमावेशक करून सर्वांसाठी डिजिटल पेमेंट पद्धतीचे लोकशाहीकरण करण्याची आमची कटिबद्धता अधोरेखित करणारी आहे. या उत्सवी पर्वात देशभरातील लक्षावधी पेटीएम वापरकर्त्यांना फ्लिपकार्टवरील खरेदीसाठी त्यांचे पेटीएम वॉलेट आणि यूपीआय उपलब्ध असणार आहे. घरातच राहून सुरक्षित पद्धतीने रक्कम अदा करण्याच्या पर्यायांच्या शोधात असलेल्या ग्राहकांना आगामी बिग बिलियन डेजमध्ये केवळ एका क्लिकच्या आधारे फ्लॅश सेल्समधील विविध आकर्षक सवलतींचा लाभ घेता येईल. यूपीआयसह डिजिटल पेमेंट्स पद्धतींना भारतात वाढते महत्त्व येत असून डिजिटल माध्यमाचा स्वीकार केल्यास भारत आर्थिकदृष्ट्या सुदृढ बनू शकतो, असा आमचा सुरुवातीपासून विश्वास आहे.”

**पेटीएमचे अध्यक्ष मधुर देवरा म्हणाले,** “खरेदी आणि पेमेंटचा विनासायास अनुभव मिळवून देण्यासाठी दोन तंत्रज्ञान कंपन्या हातमिळवणी करत आहेत, ही आनंदाची बाब आहे. फ्लिपकार्टने भारतात ई कॉमर्सला महत्त्वाचे स्थान मिळवून दिले असून पेटीएम वॉलेट आणि पेटीएम बँक अकाउंटच्या माध्यमातून कॅश ऑन डिलिव्हरीऐवजी डिजिटल पेमेंट पद्धती प्रस्थापित करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. आत्मनिर्भर भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी महत्त्वाचे ठरतील असे कल्पक सोल्यूशन्स लक्षावधी भारतीयांना उपलब्ध करून देण्यावर आमचा भर आहे. पेटीएमने डिजिटल पेमेंट परिसंस्थेचा पाया रचला असून छोट्या शहरांमधूनही ज्या प्रमाणात डिजिटल माध्यमाचा स्वीकार केला जात आहे, ते पाहता आमच्या प्रयत्नांना यश येऊ लागले आहे.”

आरबीआयच्या नव्या आकडेवारीनुसार, यूपीआय, आयएमपीएस, डेबिट व क्रेडिट कार्ड्स आदी विविध इलेक्ट्रॉनिक पद्धतींद्वारे भारतात होणाऱ्या डिजिटल व्यवहारांची संख्या येत्या पाच वर्षांत प्रति दिन सरासरी १५० कोटींवर पोहोचेल, असा अंदाज आहे. त्यानुसार डिजिटल पेमेंट्सचे मूल्य २०२५ मध्ये आजच्या ५ ट्रिलियन रुपयांवरून १५ ट्रिलियन रुपयांपर्यंत पोहोचेल. आपल्या घरातच राहून सोशल डिस्टन्सिंगचे पालन करत असताना अशा प्रकारच्या भागिदारीमुळे भारतात डिजिटल व्यवहारांना अधिक चालना मिळेल.

**About Flipkart Group**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and PhonePe. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants, and small businesses to be a part of India's e-commerce revolution, with a registered customer base of over 250 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem, and empower generations of entrepreneurs and MSMEs has inspired us to innovate on many industry firsts. The recent launch of Flipkart Wholesale, our new digital marketplace, is a testament to our commitment to accelerate the growth of kiranas and MSMEs in India. Flipkart is known for

pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns –customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market, PhonePe, India's fastest growing digital payments platform, and now Flipkart Wholesale, the Flipkart Group will continue to steer the transformation of commerce in India through technology.

**For more information, please write to media@flipkart.com**

**About Paytm:**

Paytm is India's leading digital financial services platforms that offers full-stack payments & financial solutions to consumers, offline merchants and online platforms. The company is on a mission to bring half a billion Indians into the mainstream economy through payments, commerce, banking, investments, and financial services. One97 Communications Limited that owns the brand Paytm is founded by Vijay Shekhar Sharma and is headquartered in Noida, Uttar Pradesh. Its investors include Softbank, Ant Financial, AGH Holdings, SAIF Partners, Berkshire Hathaway, T Rowe Price, and Discovery Capital.

**For more information, please write to karan@paytm.com**